सकाळ
सिंधुदुर्ग, मंगळवार,
२० जानेवारी २०१५

# कविता म्हणजे मनाचा हुंकार

## पौर्णिमा केरकर : हळबे महाविद्यालयात युवा महोत्सव

सकाळ वृत्तसेवा

दोडामार्ग, ता. १९ : ''कविता म्हणजे मनाचा हुंकार'' असे प्रतिपादन गोव्यातील कवयित्री सौ. पौर्णिमा केरकर यांनी येथे केले. निमित्त होते लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयातील युवा महोत्सवाचे.

सौ. केरकर म्हणाल्या, ''कविता म्हणजे मनाचा हुंकार. कविता ही माणसाला जगण्याची प्रेरणा देते. ती आतून मनातून स्फुरणारी असावी. यासाठी चिंतनाची गरज आहे. आपल्या अवती-भवती समाजाचे निरीक्षण करून त्यांच्या स्वभावाचे वाचन करा. माणसाला माणूसपणा येण्यासाठी प्रयत्नशील राहा. साहित्य हे संस्कृती शिकवते. चारित्र घडविले म्हणून साहित्याची जाणीव, वाचन केले पाहिजे. जगात असंवेदनशील वृत्ती वाढत आहे. असंवेदनशीलतेमुळे खऱ्या रसिकांच्या मनाची घुसमट होते. तरुणांनी आपल्या क्षमतांचा विचार न करता अथवा त्याची जाणीव न झाल्यामुळे योग्य प्रतिसाद मिळत नाही. त्यातून एकटेपणाची भावना वाढत जाते. त्यासाठी वाचन चिंतन हवे. जन्माला येताना माणूस एकटा जन्माला येतो; परंतु जाताना त्याने माणसं जोडली पाहिजेत. यासाठी संवेदनशीलतेची गरज आहे.''

या वेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी निसर्ग, प्रेम व चितगर्भ कविता सादर केल्या. साडी डे व टाय डे निमित्त मोठ्या संख्येने महाविद्यालयीन विद्यार्थीनी साडी, तर विद्यार्थी सूट व टाय परिधान करून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. ए. पाटील होते. सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते. प्रा. दिलीप बर्वे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. प्रशांत ढेपे यांनी आभार मानले.